# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.10.2025** **वारःशुक्रवार**

---

1. भारत चीन दरम्यान थेट विमानसेवा पुन्हा सुरू होणार
2. देशभरात विजयादशमीचा सण पारंपरिक उत्साहात साजरा
3. पंतप्रधान मोदी आणि रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्यात डिसेंबर महिन्यात शिखर परिषद
4. जगविख्यात वन्यजीव संशोधक जेन गुडाल यांचं निधन आणि
5. अहमदाबाद कसोटी क्रिकेट सामन्यात पहिल्या दिवसअखेर भारताच्या 2 गडी बाद 121 धावा

**भारत-चीन विमानसेवा**

भारत आणि चीनदरम्यान थेट विमानसेवा या महिन्याच्या शेवटी पुन्हा सुरू करण्याला दोन्ही देशांनी स्वीकृती दिली आहे. दोन्ही देशांमधल्या ठराविक शहरांमधून ही थेट विमानसेवा उपलब्ध असेल. भारत आणि चीनमधले संबंध पुन्हा सामान्य बनवण्याच्या सरकारच्या धोरणानुसार हे पाऊल उचलण्यात आलं आहे. यामुळे नागरिकांमधला संपर्क वाढेल आणि द्विपक्षीय संबंध सुधारण्याला मदत होईल असं परराष्ट्र मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू किंजारापू यांनी काल एअरबस आणि इंडिगो या विमान कंपन्यांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांसोबत उच्च स्तरीय बैठक घेतली. भारतातील नागरी हवाई वाहतूक क्षेत्र मजबूत करण्यासह भारत आणि युरोपमधले आर्थिक संबंध दृढ करण्यावर या बैठकीत भर देण्यात आला.

**दसरा**

असत्यावर सत्याच्या विजयाचा प्रतीक असलेला विजयादशमीचा सण काल देशभरात उत्साहात साजरा झाला. महाराष्ट्रात कोल्हापुरात शाही दसरा आणि साताऱ्यात शाही सीमोल्लंघन पारंपरिक पद्धतीनं साजरं करण्यात आलं. विविध पक्ष संघटनांचे दसरा मेळावे ही कल पार पडले. मुंबईत शिवसेनेचा आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा दसरा मेळावा आयोजित करण्यात आला होता.  शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच मदत करण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मेळाव्यात बोलताना दिली. लाडकी बहिण योजना कधीही बंद होणार नाही, असं ते म्हणाले. शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये तत्काळ मदत जाहीर करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाच्या मेळाव्यात केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थानिक शाखांनी ठिकठिकाणी विजयादशमी संचलन आणि शस्त्रपूजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. 69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूरमध्ये दीक्षाभूमीवर झालेल्या मुख्य कार्यक्रमात अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी उपस्थितांना धम्मोपदेश दिला. या कार्यक्रमाला देशभरातले लाखो अनुयायी उपस्थित होते.

**रामदास आठवले**

बिहारमधील बोधगया इथल्या महाबोधी मंदिराचे व्यवस्थापन बौद्धांकडे सोपवण्याच्या  मागणीसाठी या महिन्याच्या 14 तारखेला मुंबईत एक सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. 1992

पासून ही मागणी सुरू असल्याचं त्यांनी काल एका संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना सांगितलं. सर्व राजकीय आणि सामाजिक गटांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून या कारणासाठी एकत्र येण्याचे मान्य केलं असल्याचं आठवले यांनी यावेळी सांगितलं.

**जयंती**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांची जयंती काल देशभरात साजरी करण्यात आली. नवी दिल्लीत राजघाट इथं, महात्मा गांधींच्या समाधीस्थळी, सर्वधर्म प्रार्थनेचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते, राहुल गांधी यांनी गांधींजींना आदरांजली वाहिली.

**पुतीन भारत भेट**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन डिसेंबर महिन्यात भारत दौऱ्यावर येणार आहेत. पुतीन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात यावेळी वार्षिक शिखर परिषद होणार आहे. क्रेमलिनचे प्रवक्ते डिमित्री पेस्केव यांनी काल या वृत्ताला दुजोरा दिला. युक्रेन संघर्ष सुरू झाल्यानंरचा पुतीन यांचा हा पहिलाच भारत दौरा असेल.

**डोनाल्ड ट्रम्प**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरीकेत सध्या सुरू असलेल्या सरकारी शटडाऊनला सरकारी कर्मचारी कमी करण्याची अभूतपूर्व संधी असल्याचं म्हटलं आहे. कोणत्या एजन्सींना या कपातीचा सामना करावा लागू शकतो यावर चर्चा करण्यासाठी व्यवस्थापन आणि वित्त कार्यालयाचे संचालक रसेल वॉट यांच्यासोबत बैठक घेणार असल्याचं ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल या माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**अरुणाचल लष्कर मदत**

अरुणाचल प्रदेशात झालेल्या बस अपघातानंतर लष्करानं 13 नागरिकांची सुखरुप सुटका केली आणि त्यांच्यावर उपचारही केले. तवांग जिल्ह्यात बैसाखी इथं 13 प्रवाशांना घेऊन जाणारी बस दरीत गडगडत गेल्यामुळे हा अपघात झाला. अपघाताचं वृत्त कळताच लष्करानं तातडीनं बचावकार्य सुरू करुन सर्व प्रवाशांना वाचवलं.

**नक्षलवादी**

छत्तीसगडमधल्या बिजापूर जिल्ह्यात काल 103 माओवादी पोलिसांना शरण आले. यातील 49 जणांवर मिळून एक कोटी सहा लाख रुपयांचं बक्षीस जाहीर झालं होतं. राज्य सरकारच्या पुनर्वसन धोरणानुसार शरण आलेल्या प्रत्येक शरणार्थ्यांला पन्नास हजार रुपयांचं अर्थसहाय्य देण्यात आलं.

**निधन-पारीख**

ज्येष्ठ गांधीवादीनेते आणि स्वातंत्र्यसैनिक जी. जी. पारीख यांचं काल मुंबईत निधन झालं. ते 100 वर्षांचे होते. पारीख यांना 1942 च्या चले जाव चळवळीत तुरुंगवास भोगावा लागला होता. विद्यार्थी काँग्रेसच्या मुंबई शाखेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केलं होतं.

**निधन-जेन गुडाल**

जगविख्यात प्रायमेट्स आणि मानववैज्ञानिक जेन गुडाल यांचं अमेरिकेत निधन झालं. त्या 91 वर्षांच्या होत्या. निसर्ग विश्वाच्या जतनासाठी आयुष्याची साठ वर्षे अथकपणे समर्थन करणाऱ्या जेन गुडाल यांनी, ग्रेट एप्स म्हणजे महाकपिंच्या अभ्यासात क्रांति घडवून आणली. त्यांच्या जीवनकार्यावर हा वृत्तांत...

**चिंपांझी आणि इतर महाकपिंचा अभ्यास करताना त्याने अनेक शोध लावले. चिंप्स अवजारांचा वापर करतात, त्यांचं सामाजिक जीवन अतिशय गुंतागुंतीचं असतं आणि प्रसंगी ते एकमेकांचा जीव घेण्याइतके क्रूरही असू शकतात या अतर्क्य गोष्टी त्यांनी 1960 मध्ये टांझानियातील गोम्बी स्ट्रीम नॅशनल पार्कमध्ये निरीक्षण करुन जगासमोर आणल्या. चिंप्स आणि मानव यांचे वंशज सामायिक असू शकतात असं यातून सूचित झालं. मनुष्य म्हणजे नेमका काय आहे यावर वादसंवाद होऊ लागले, प्राण्यांच्या अधिकारावर नव्यानं विचार होऊ लागले. नैसर्गिक विश्वाबद्दल अधिक चांगल्या पद्धतीनं जाणून घेण्याच्या उद्देशानं जेन गुडाल यांनी जगभरात दौरे करुन संवाद साधला. मृत्युच्या काही दिवस आधीपर्यंत त्या याच उद्देशासाठी कार्यरत होत्या. वन्य प्राण्यांची वसतीस्थानं नष्ट होत असल्याबाबत त्यांनी जगाला हवामान बदलावर तातडीनं कृती करण्याचं आवाहन केलं. अजूनही वेळ गेलेली नाही, असं त्यांचं मत होतं. जेन गुडाल यांचा वारसा संशोधकांच्या अनेक पिढ्यांना निश्चितच प्रेरणा देत राहील. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.**

**<u>पॅरा-ॲथलेटिक्स</u>**

नवी दिल्ली मध्ये सुरू असलेल्या 12 व्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत काल भारताने आणखी दोन पदकांची कमाई केली. त्यामुळे 4 सुवर्ण, 5 रौप्य आणि 2 कास्य पदकासह पदक तालिकेत भारत सातव्या स्थानावर पोहोचला आहे. काल धरमबीर नैन यानं पुरुषांच्या F51 क्लब थ्रोमध्ये रौप्यपदक जिंकलं. तर F57 प्रकारात, अतुल कौशिकनं कांस्यपदक मिळवलं.

**<u>भारोत्तोलन</u>**

नॉर्वेमध्ये सुरू असलेल्या जागतिक भारोत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत काल भारताच्या मीराबाई चानू हिनं महिलांच्या 48 किलो वजनी गटात रौप्य पदक मिळवलं. चानू हिनं एकूण 199 किलो वजन उचललं. यात स्नॅचमध्ये 84 किलो आणि क्लीन अँड जर्क प्रकारात 115 किलो वजन तिनं उचललं.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि वेस्ट इंडीज संघांदरम्यान अहमदाबाद इथं सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्या काल पहिल्या दिवसाचा खेळ संपला त्यावेळी भारताच्या पहिल्या डावात 2 गडी बाद 121 धावा झाल्या होत्या. के. एल. राहुल 53 तर शुभमन गिल 18 धावांवर खेळत आहेत. तत्पूर्वी वेस्ट इंडीजचा पहिला डाव भारतीय गोलंदाजांनी 162 धावांत गुंडाळला. मोहम्मद सिराजनं 4 आणि जसप्रीत बुमराहनं 3 फलंदाजांना बाद केलं.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.